# श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय : स्थापना आणि वाटचाल

## वारसा 50 वर्षाचा...

सन 1962 मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यामुळे शहराला शैक्षणिकदृष्ट्या महत्व प्राप्त झाले होते. त्यादृष्टीने वसतिगृहयुक्त (रेसिडेन्शियल) महाविद्यालय कोल्हापुरात असणे श्री शाहू छत्रपती संस्थेला आवश्यक वाटत होते. कारण कोल्हापूर मध्ये अशा प्रकारचे वसतिगृहयुक्त महाविद्यालय त्याकाळात कुठेही नव्हते, ही उणिव दूर करण्यासाठी अशा पद्धतीचे महाविद्यालय काढण्यांत संस्थेने पुढाकार घ्यावा अशा सूचना तत्कालीन शिक्षण क्षेत्रांतील अनेक तज्ञ आणि तपस्वी कार्यकर्त्यांनी केल्या होत्या.

संस्थेची आणखी एक भूमिका होती असे संस्थेच्या तत्कालीन ठरावावरून दिसते. यामध्ये, कोल्हापुरातील पहिले वसतिगृह हे आमचेच होय. त्यानंतर राजर्षि शाहू महाराजांनी शिक्षणाद्वारे समाज जागृती आणि विविध जाती धर्मात सहकार्य करण्याचा उदात्त हेतूने निरनिराळया जातींना आपल्या जाती बांधवसाठी वसतिगृह काढण्यास उत्तेजन दिले. त्यांना आमच्या संस्थेच्या आसपास जागा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे आमच्या संस्थेच्या परिसरात श्री दिगंबर जैन वसतिगृह (विद्यार्थी 250), श्री वीरशैव लिंगायत वसतिगृह (विद्यार्थी 225), चांद्रसेनी कायस्थ प्रभु वसतिगृह (विद्यार्थी 36), सारस्वत वसतिगृह (विद्यार्थी 25), मुस्लिम वसतिगृह (विद्यार्थी 75), पांचाल वसतिगृह (विद्यार्थी 21) आणि वैश वसतिगृह (विद्यार्थी 18) इत्यादी वसतिगृह निर्माण झाली आहेत. या सर्व वसतिगृहामुळे कोल्हापूरला "Mother of Boarding House" असा लौकिक प्राप्त झाला आहे. ही सर्व पार्श्वभूमी विचारात घेऊन आम्ही वसतिगृहयुक्त महाविद्यालय काढण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्या संस्थेच्या आवारात वसतिगृहाशिवाय एका मोठ्या अद्यावत महाविद्यालयास साजेशी भव्य इमारत बांधण्यास जागा उपलब्ध असून शेजारीच क्रीडांगणाची व्यवस्था आहे. हा सर्वच परिसर कोल्हापूरचा शैक्षणिक परिसर म्हणून ओळखला जात आहे. येथे महाविद्यालयाची सोय झाली तर ते सर्वच विद्यार्थी वर्गाला अत्यंत फायदयाचे ठरणार आहे. असे म्हटले असून या ठरावास अनुसरून सर्वसमावेशकवसतिगृहयुक्त महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेऊन खर्चाची जिम्मेदारी संस्थेने पत्करली.

संस्थेने, शिक्षणाद्वारे जनजागृती आणि जातीय सलोखा या राजर्षि श्री शाहू छत्रपती महाराजांच्या उदात्त दृष्टिकोनाचे सुरुवातीपासून पालन केलेले होते. इतर जमातीची वसतिगृहे कोल्हापुरात नव्हती तेंव्हा श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहात इतर जमातीच्या गरजू विद्यार्थ्यांची सोय करण्यात आलेली होती. याबाबतीत कोणत्याही स्वरूपाचा भेद केलेला नव्हता आणि हाच दृष्टिकोण हे वसतिगृहयुक्त महाविद्यालय सुरू करण्याच्या बाबतीत होता. याचा अर्थ सर्व जातीधर्मांच्या मुलांच्यासाठी एक उत्तम व आदर्श निवासी वसतिगृहयुक्त महाविद्यालय निर्माण करणे हेच प्राथमिक ध्येय मनाशी बाळगून श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाने संस्थेच्या आवारात वसतिगृहयुक्त कॉलेज काढावे असा निर्णय ता. 29 जून 1969 रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत घेतला. पुढे 2 नोव्हेंबर 1969 रोजी श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेतील विषय क्रमांक 6 नुसार संस्थेच्या वतीने वसतिगृहयुक्त महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात चर्चा होऊन महाविद्यालय स्थापनेचा निर्णय झाला.

**महाविद्यालय स्थापने संदर्भातील अग्रलेख :**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून वसतिगृहयुक्त महाविद्यालय सुरू होणार याची चर्चा सुरू झाल्यानंतर दि. 16 मे 1971 रोजी दै. समाज मध्ये अग्रलेख प्रसिद्ध झाला. दै. समाजचे संपादक पद्मभूषण श्री बाळासाहेब पाटील यांनी तो लेख लिहिला होता. त्यामध्ये त्यांनी, श्री शाहू छत्रपती मराठा विद्यार्थी वसतिगृह हे कोल्हापूरचे खास वैशिष्ट्य. मात्र त्यापेक्षाही शैक्षणिक कार्याचा अधिक विस्तार करणे ही काळाची गरज होती. राजर्षि शाहू महाराजांच्या नावाने आणि पदस्पर्शाने पुनीत झालेल्या संस्थेच्या माध्यमातून एखादे निवासी महाविद्यालय सुरू करून शाहू महाराजांच्या विचारांचे संस्कार घडविणारे शिक्षण मिळावे व प्रखर सामाजिक जाणीव निर्माण झालेला तरुण या महाविद्यालयातून तयार व्हावेत अशी अपेक्षा. संस्थेच्या स्वतःच्या भव्य इमारती आहेत व वसतिगृहयुक्त महाविद्यालय म्हणून विद्यार्थ्यांची चांगली सोय होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील कौलवकर व मानद सचिव श्री सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय सुरू करत असताना प्रवेशीत विद्यार्थ्यांना अखिल भारतीय पातळीच्या स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र सुरू करणे हे संस्थेचे ध्येय असल्याचे म्हटले आहे.

**राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक व्हावे :**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेने सुरू केलेले कला व वाणिज्य महाविद्यालय म्हणजे शिक्षणाद्वारे जनजागृती आणि जातीय सलोखा या राजर्षि श्री शाहू छत्रपती महाराजांच्या उदात्त ध्येयवादाचे चिरंतन स्मारक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे उज्ज्वल प्रतिक व्हावे असा संस्थेचा मानस होता. कोल्हापूर शहराच्या शैक्षणिक जीवनात वसतिगृहयुक्त महाविद्यालयाची एक मोठी उणीव आहे आणि ही उणीव दूर करून नव्या पिढीला राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेची उत्कृष्टपणे जोपासना करण्याची संधी मिळवून द्यावी असे उद्दिष्ट होते. महाविद्यालयाचे हे स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत याची ग्वाही तत्कालीन कार्यकारी मंडळाने दिली होती.

**महाविद्यालयाचे ध्येय आणि उदिष्ट्ये :**

महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय झाल्यानंतर प्रस्तावित महाविद्यालयाची ध्येय व उद्दिष्ट्ये कोणती असावीत याचाही निर्णय घेण्यात आला. त्यानुसार,

- राजर्षी शाहूंच्या लोकशिक्षण, सामाजिक न्याय आणि समानता या मूल्यांची जपणूक करणे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण प्रसार करणे.
- शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थी व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे.
- विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये रूजविणे.

**महाविद्यालयाचे ब्रीद वाक्य :**

ज्ञान हेच श्रेष्ठ बल आहे, ज्ञान हेच अमृत आहे, ज्ञानाशिवाय तरणोपाय नाही, ज्ञानाला दुसरा पर्याय नाही असा विचार करून महाविद्यालयाने **'ज्ञानं हि परमं बलम्'** हे ब्रीद वाक्य स्वीकारले.

**महाविद्यालयातील पहिला कार्यक्रम :**

दि. 15 जून 1971 रोजी कला आणि वाणिज्य महाविद्यालय या नावाने महाविद्यालय नियमितपणे सुरू झाले. महाविद्यालयाच्या इतिहासातील पहिला उद्घाटनपर कार्यक्रम दि. 23 जुलै 1971 रोजी छत्रपती राजाराम महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने संपन्न झाला. दै. समाजचे संपादक पद्मभूषण बाळासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य एस. एस. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी श्री. पाटील यांनी, श्री छ. राजाराम महाराजांनी

आपल्या दीड तपाच्या कारकिर्दीत कोल्हापुरात जी शैक्षणिक क्रांती केली त्याला संस्थानिकांच्या इतिहासात तोड नाही, ही शैक्षणिक क्रांती करीत असताना शिक्षणाच्या प्रत्येक कामात महाराजांनी जातीने पुढाकार घेतला. राजाराम महाराजांनी केलेल्या या शैक्षणिक क्रांतीमुळे कोल्हापूरचे स्थान पुण्याच्या बरोबरीचे झाले आहे. छ. राजाराम महाराजांनी केलेले शैक्षणिक कार्य हे अलौकिक कार्य होते, त्यांनी कोल्हापुरात निर्माण केलेल्या ज्ञानगंगेमुळे म्हैसूर व महाराष्ट्राचे नेतृत्व करणारी थोर मंडळी जन्मास आली. राजाराम महाराज संपूर्णपणे निर्व्यसनी होते. विद्यार्थ्यांवर त्यांचे अपार प्रेम होते. त्यांचा स्वभाव बागेतील फुलांसारखा गोड होता. राजाराम महाराजांचे हे थोर चरित्र समजावून घेवून विद्यार्थ्यांनी त्याच्या अभ्यास करावा, अशा भावना व्यक्त केल्या होत्या. या कार्यक्रमास पुणे विभागाचे डी.आय.जी. मेबाजीराव कांबळे यांची विशेष उपस्थिती होती.

**महाविद्यालयाची वर्षपूर्ती आणि संस्थेची शाबासकी :**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या 70 वर्षाच्या वाटचालीत महाविद्यालयाच्या स्थापनेने संस्थेचा व्याप व विस्ताराचे क्षेत्र आणखी वाढले. यासंबंधी संस्था अहवालात, संस्थेच्या इतिहासात महत्वाचे ठरावे असे हे प्रगत वर्ष मानावे लागेल. राजर्षि श्री शाहू छत्रपती महाराजांच्या दूरदृष्टीच्या ध्येय धोरणास आलेले हे फळ असा याचा उल्लेख सुवर्ण अक्षरांनी करावा इतके याला महत्व आहे. बहुजन समाजाच्या शैक्षणिक उद्दिष्टाचे स्वप्न साकारल्याचा आनंद म्हणजेच संस्था द्वारा आर्टस व कॉमर्स कॉलेज सुरू करण्याची कल्पना कार्यकारी मंडळाने उद्घोषित केली व कार्यवाहीही तितक्याच उत्साहाने झाली व कॉलेजला तरुण, उत्साही, शिक्षणप्रेमी व अभ्यासू प्राचार्य म्हणून श्री. एस.एस. भोसले हे लाभले अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे.

**पहिला वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ :**

महाविद्यालयाचा पहिला वार्षिक परितोषिक वितरण समारंभ प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित भीमसेन जोशी यांच्या हस्ते संपन्न झाला. या समारंभात महाविद्यालयातील सन 1971 ते 1973 या वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. एस.भोसले हे होते.

**महाविद्यालयाचे नामाभिदान - श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय :**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे पेट्रन इन चीफ तथा अध्यक्ष श्रीमंत श्री शहाजी छत्रपती महाराजांनी प्रथमपासूनच संस्थेच्या विविध शैक्षणिक उपक्रमासाठी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देऊन उदार हस्ते आर्थिक मदत केली होती. त्यामुळे महाविद्यालय सुरू करण्याचा संकल्प कार्यकारी मंडळाने मांडला तेंव्हा तो शहाजी महाराजांनी उचलून धरला. सन 1971 मध्ये महाविद्यालय सुरू झाले तेंव्हा महाविद्यालयाचे नाव कला व वाणिज्य महाविद्यालय (शाहू बोर्डिंग कॉलेज) असे होते. दि. 6 जानेवारी 1973 रोजी श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्रमांक 4 नुसार संस्थेने सुरू केलेल्या कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या नामंतराचा ठराव तत्कालीन चेअरमन बाळासाहेब पाटील-कौलवकर यांनी मांडला. ठरावावर चर्चा होवून संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष व राजर्षि शाहू छत्रपती महाराजांचे नातू श्रीमंत श्री शहाजी छत्रपती महाराजांचे नाव द्यावे असे संस्थेचे तत्कालीन मानद सचिव श्री सर्जेराव पाटील यांनी सूचित केले आणि महाविद्यालयाचे नाव श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय असे निश्चित झाले.

**राजवाड्यातील महाविद्यालय :**

सन 1974-75 या शैक्षणिक वर्षामध्ये श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय शलिनी पॅलेस (फुले सदन) मध्ये स्थलांतरीत करण्याचा निर्णय झाला. शालिनी पॅलेस ही इमारत त्यावेळेळी फुलेवाडी कार्यकारी सोसायटी यांच्याकडे होती. कै. बोंद्रेदादांनी शालिनी पॅलेसला फुले सदन असे नाव दिले. महाविद्यालय राजवाड्यातच का याचे दुसरे एक कारण होते की, सन 1974 मध्ये तत्कालीन शिक्षण मंत्री ना. मधुकरराव चौधरी यांनी कोल्हापूर दौऱ्याप्रसंगी शलिनी पॅलेसला भेट दिली होती. याप्रसंगी कै. बोंद्रेदादांनी ना. चौधरी यांचे स्वागत करून पॅलेस फिरून दाखवला आणि या जागी (राजवाड्यात) शैक्षणिक विकासाचे कार्य घडावे अशी इच्छा प्रकट केली. यावर ना. चौधरी, आपल्या लोकशाही मध्ये सहकारी संस्था एक भव्य राजवाडा खरेदी करून त्याचा समाज कार्यासाठी उपयोग करते हे मोठे वैशिष्ट्ये समजावे लागेल. या राजवाड्याचा उपयोग शैक्षणिक विकासासाठी कसा करता येईल याचा मी जरूर विचार करीन. असे म्हटले. याचा अर्थ कै. दादांच्या मनात एखादे शैक्षणिक संकुल राजवाड्यात उभे करावे याचा विचार दीर्घकाळापासून मनात असावा असे दिसते. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे स्थलांतर राजवाड्यात करून दादांनी त्याला मूर्त स्वरूप दिले.या संबंधी कै. दादा नेहमी म्हणत की, "शेतकऱ्यांची मुले आता राजवड्यात शिक्षण घेत आहेत, याचा आमच्या शाहू मराठा शिक्षण संस्थेला सार्थ अभिमान आहे."

**शहाजीची गरुड भरारी :**

कै. बोंद्रेदादांनी महाविद्यालयाचे नूतन प्राचार्य म्हणून श्री. आबासाहेब शिंदे यांना कोल्हापुरात आणले. प्राचार्य डॉ. शिंदे यांनी एक-दोन वर्षात जे अभिनव स्वरूपाचे प्रयोग अन उपक्रम सुरू करून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. त्यामुळे चैतन्य आणि उत्साह निर्माण झाला. राबविलेले उपक्रम लोकांपर्यंत पोहचावेत म्हणून त्यांनी असोसिएशन ऑफ एशियन युनिवर्सिटीज मार्फत दिल्ली येथे सन 1975 मध्ये आयोजितकेलेल्या इंटरनॅशनल सेमिनार ऑन हायर एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट हा शोधनिबंध सादर केला. याचा वृत्तांत दि. 14 मे 1975 रोजी टाइम्स ऑफ इंडिया मध्ये 'एका महाविद्यालयाची नूतन पद्धती' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला. त्यामुळे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाची वेगळीच ओळख निर्माण झाली. महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल अली यावर जंग यांनीही महाविद्यालयाच्या उपक्रमांची स्तुती केली. या काळात श्री शहाजी महाविद्यालय म्हणजे ब्रँड म्हणून नावारूपाला आले.

**महाविद्यालयाच्या नवीन इमारतीची पायाभरणी :**

दि. 11 डिसेंबर 1980 हा श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या वाटचालीतील संस्मरणीय दिवस उजाडला. महाविद्यालयाच्या वास्तूसाठी जागा निश्चित झाली. राजर्षि श्री शाहू महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वसतिगृहाच्या परिसरात नियोजित श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमीपूजन आणि पायाभरणी समारंभ तत्कालीन युवराज श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांच्या हस्ते आणि कोल्हापूर महानगरपालिकेचे तत्कालीन महापौर मा. दत्तात्रय नरहरी कणेरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. आपल्या उदघाटनपर भाषणामध्ये युवराज श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी, “माझ्या पणजोबांनी केलेले शैक्षणिक कार्य श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था अत्यंत तळमळीने पुढे नेत आहे याबद्दल मला अभिमान आहे”. असे म्हटले तर कै. श्रीपतराव बोंद्रेदादांनी या प्रसंगी आपल्या भाषणात, “मोठ्या इमारती बरोबरच मोठ्या मनाची, बुद्धीची हुशार मुले घडविण्याची जबाबदारी महत्वाची असल्याचे स्पष्ट केले”. महापौर मा. दत्तात्रय नरहरी कणेरकर यांनी आपल्या

अध्यक्षीय भाषणात, "अर्बन बँकेचा एक सदस्य या नात्याने महाविद्यालयाच्या बांधकामासाठी दिलेले कर्ज याचा अर्थ छ. शाहूंच्या ऋणातून उतराई होणे असा आहे" असे प्रतिपादन केले.

**महाविद्यालयाचे शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहात पुन्हा स्थलांतर :**

सन 1971 ते 1980 या दशकात 175 विद्यार्थी संख्या ते 1500 हा मोठा टप्पा महाविद्यालयाने पूर्ण केला. शलिनी पॅलेसची इमारत वाढत्या विद्यार्थी संख्येला अपूरी पडू लागल्याने नवीन इमारतीची नितांत गरज होती. संस्थेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यानी जून 1981 मध्ये महाविद्यालय दसरा चौकातील श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहामध्ये स्थलांतरित केले.

**महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन :**

पाहता पाहता महाविद्यालयाची नवीन वास्तू दिमाखात पूर्ण झाली. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन दि. 25 ऑगस्ट 1983 रोजी तत्कालीन उपपंतप्रधान आणि आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते आणि तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या भव्य सोहळ्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा चीफ पेट्रन श्रीमंत शाहू महाराज, तत्कालीन मंत्री मंडळातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. स्थापत्य विशारद मेसर्स बेनाडीकर-पाटील हे होते. महाविद्यालयाच्या बांधकामास एकूण 28,00,000/- रुपये खर्च झाल्याची नोंद मिळते.

**प्रशासकीय स्तरावरील मान्यता :**

दि. 15 जून 1971 रोजी महाविद्यालयाची सुरवात झाली असली तरी त्या आधीपासून संस्थेने प्रशासकीय पातळीवर शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासन स्तरावर मान्यता प्राप्त करण्यासाठी प्रक्रिया सुरू केली होती. शिवाजी विद्यापीठाने दि. 12 फेब्रुवारी 1971 रोजीच्या पत्राने सामान्य सलग्नीकरण दिलेले होते. त्यामुळे महाविद्यालय स्थापनेपासून शासनाच्या Grant-in-Aid या तत्त्वानुसार अनुदान सुरू झाले. महाराष्ट्र शासनाने दि. 1 जानेवारी 1972 रोजी अधिसूचना काढून पहिल्या वर्षी महाविद्यालयातील प्री डिग्री विषयांना मान्यतादिली. (संदर्भ:शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग UKF 9771-18113, दि. 1-1-1971.) शिवाजी विद्यापीठाने जून 1972 पासून पदवी अभ्यासक्रमासाठी सलग्नता असल्याची मान्यता दिली. जून 1975 मध्ये यूजीसीकडून महाविद्यालयामध्ये बूक बँक योजना सुरू करण्यास मान्यता मिळाली. सन 1977-78 हे वर्ष महाविद्यालयाच्या दृष्टिकोणातून महत्वाचे होते. वाढलेली विद्यार्थी संख्या आणि तज्ञ व अनुभवी प्राध्यापकांच्या जोरावर महाविद्यालयाने जे अनोखे उपक्रम राबविले त्याच्या परिणाम स्वरूप विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालयाला गुणवत्ता कॉलेज **Quality College** दर्जा प्राप्त झाला, महाविद्यालयासाठी हा खूप मोठा सन्मान आणि गौरव होता. दि. 07 मार्च 1977 रोजी UGC Act 1956 अंतर्गत 2f चा दर्जा प्राप्त झाला. (संदर्भ: UGC Letter No. F-8-94/77 (op)). 2f चा दर्जा प्राप्त करण्यासाठी महाविद्यालय प्रशासन 1975 पासून प्रयत्नशील होते. सन 1992 मधील 8व्या पंचवार्षिक योजने मध्ये महाविद्यालय 12B मध्ये समाविष्ट झाले. महाविद्यालयास सन 1971 ते 1993 पर्यंत तीन-तीन वर्षाच्या कालावधीसाठी शिवाजी विद्यापीठाची संलग्नता प्राप्त होत होती. दि. 13 जुलै 1993 रोजी शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयास कायमस्वरूपी निरंतर संलग्नीकरणाची मान्यता दिली.

**प्राचार्य, प्राध्यापकांची समृद्ध परंपरा :**

महाविद्यालयाला समृद्ध नेतृत्वाची संपन्न परंपरा लाभली असून डॉ. एस. एस. भोसले, डॉ. आबासाहेब शिंदे, डॉ. व्ही. डी. कटांबळे, डॉ. डी. आर. मोरे या माजी प्राचार्यांनी महाविद्यालयाला वैचारिक दिशा दिली. त्याचबरोबर विविध विषयात पारंगत असणाऱ्या विद्वान प्राध्यापकांनी महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातली. यामध्ये डॉ. ल. रा. नसिराबादकर, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. केचे, प्रा. घारगे, डॉ. जयसिंगराव पवार, प्रा. के. एच. ठक्कर, प्रा. मुतालिक देसाई, डॉ. एन.टी. थोरात, प्रा. आनंदराव वैराट, प्रा. सुधाकर मानकर, प्रा. र. घ. वराडकर, प्रा. के. एम. मोरे, प्रा. डी. एन. पंगू, श्रीमती मीना कुलकर्णी, प्रा. आर. जी. कुलकर्णी, प्रा. तिवले, प्रा. श्रीमती रजनी भागवत, कै. डॉ. डी. बी. रत्नाकर, प्रा. आनंद गिरीगोसावी, प्रा. एस. टी. मुळे, प्रा. डी. डी. कदम, डॉ. आर. जी. गोकाककर, प्रा. ई. आर. काटकर, डॉ. एच. एस. वनमोरे, डॉ. पी. आर. शेवाळे, डॉ. एन. व्ही. शहा, प्रा. एस. ए. वडगावे, प्रा. के. एन. निर्मळे, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. एम. टी. सुर्यवंशी, सौ. प्रतिभा पाटील, प्रा. दिनेश डांगे, प्रा. निकम पाटील, सौ. भोसले, सौ. घोलप, सौ. चांदेकर, सौ. ए. ए. पाटील, प्रा. राठोड, प्रा. अशोक पाटील आदींचा आवर्जून उल्लेख करता येतो.

विद्यमान प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या नेतृत्त्वाखाली सध्या पुढील प्राध्यापक सहकारी कार्यरत आहेत. यामध्ये वरिष्ठ विभागाकडील मराठी विभागाचे प्रा. डॉ. डी. के. वळवी, हिंदी विभागाचे प्रा. ए. आर. कांबळे, डॉ. सौ. एस. एस. पाटील, इंग्रजी विभागाचे डॉ. एन. एस. जाधव, डॉ. एम. आर. वैराट, इतिहास विभागाचे डॉ. एस. व्ही. शिखरे, प्रा. एस. डी. अपराध, डॉ. एस. डी. जाधव, राज्यशास्त्र विभागाचे डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. व्ही. जे. देठे, अर्थशास्त्र विभागाचे डॉ. सौ. एस. एस. राठोड, डॉ. डी. पी. गावडे, समाजशास्त्र विभागाचे डॉ. के. एम. देसाई, भूगोल विभागाचे प्रा. आर. एम. कांबळे, डॉ. डी. एल. काशिद-पाटील, डॉ. सौ. एन. डी. काशिद-पाटील, कॉमर्स विभागाचे प्रा. एस. एच. कांबळे, ग्रंथपाल डॉ. बी. पाटील, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. पी. बी. पाटील यांचा समावेश आहे.

कनिष्ठ विभागाकडे मराठी विषयाचे प्रा. आर. एस. कांबळे, प्रा. जी. वाय. जाधव, प्रा. पी. के. पाटील, हिंदी विषयाचे प्रा. एन. एस. पाटील, इंग्रजी विषयाचे प्रा. एम. एन. कांबळे, प्रा. एस. एच. घोडके, प्रा. यु. एस. अपराध, इतिहास विषयाचे प्रा. एम. एम. कदम, राज्यशास्त्र विषयाच्या प्रा. कु. व्ही. व्ही. उरूणकर, समाजशास्त्र विषयाचे प्रा. एन. सी. कुंभार, भूगोल विषयाचे प्रा. डॉ. सौ. ए. डी. पाटील, प्रा. ए. बी. शेळके, प्रा. एम. टी. पाटील, अर्थशास्त्र विषयाचे प्रा. पी. जी. अंगज, कॉमर्स विषयाचे प्रा. सौ. एम. एम. गायकवाड, प्रा. सौ. एस. बी. पाटील, प्रा. व्ही. ए. पाटील, प्रा. पी. एच. पाटील, पर्यावरण विषयाचे प्रा. एस. एच. चरापले यांचा समावेश आहे.

**प्रशासकीय वारसा :**

महाविद्यालयाच्या प्रारंभीच्या काळात कै. एस. एन. परब अधिक्षक होते. कै. वाडदेकर, कै. एस. एन. पिंगळे, कै. बराले हे लिपीक म्हणून तर शिवाजी जाधव, के. एल. चव्हाण, कै. गजाभाऊ, कै. नायकू कांबळे हे शिपाई म्हणून काम पाहत होते.

कै. एस. एन. परब यांच्यानंतर काही काळ कै. वाडदेकर यांनी अधिक्षक पदाचे काम पाहिले. त्यानंतर 1980 मध्ये कै. एस. एन. पिंगळे हे अधिक्षक पदी रूजु झाले. त्याचवेळी प्रशासकीय कर्मचारी संख्याही वाढली. यामध्ये कै. सुधाकर वाडकर, कै. पी. डी. चिकोडी, आर. पी. शिंदे, कै. पी. एम. पाटील (चिखली), ए. डी. पाटील (अकौंटंट), कै. डी. जी. पाटील, ए. पी. पाटील यांचा समावेश होता.

तर चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून श्री. मादर, कै. तुकराम धनवडे, डी. आर. पाटील, आनंदा शिंदे, गोपाळ पाटील, प्र. र. पाटील, बिभीषण धावारे कार्यरत होते.

सन 1995 मध्ये महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या 2000 पेक्षा जास्त झाली. त्यावेळी महाविद्यालयास प्रबंधक पद मंजूर झाले व पहिले प्रबंधक म्हणून कै. श्री. एस. एन. पिंगळे व कै. चिकोडी हे अधिक्षक म्हणून काम पाहू लागले. कै. पिंगळे यांच्यानंतर कै. चिकोडी हे प्रबंधक म्हणून काम पहात होते. तर मुख्य लिपीक म्हणून श्री. आर. पी. शिंदे हे काम पाहू लागले. कै. चिकोडी यांच्यानंतर श्री. आर. पी. शिंदे प्रबंधक झाले व श्री. अशोक भास्कर हे मुख्य लिपीक म्हणून काम पाहू लागले.

सन 2009 पासून महाविद्यालयाच्या प्रबंधक पदी श्री. रवींद्र भोसले व अधिक्षक पदी श्री. मनिष भोसले हे काम पाहत असून श्री. एम. ए. दावणे, श्री. आर. एच. पाटील, श्री. एस. आर. पाटील, श्री. आर. एम. सुळेकर, श्री. ए. डी. हराळे, श्री. एस.एम. कदम, श्री. यु. बी. गांगुर्डे, सौ. यु. यु. साळोखे, हे लिपीक म्हणून कार्यरत आहेत. तसेच सेवक वर्गामध्ये श्री. बी. आर. इंगवले, श्री. के. एम. सुरवसे, श्री. व्ही. पी. लाड, श्री. डी. व्ही. कांबळे, श्री. पी. आर. वरूटे, श्री. डी. एन. गुरव, श्री. ए. एन. कांबळे, श्री. जी. आर. गोसावी, श्री. एस. डी. पाटील, श्री. डी. जी. तिबिले, श्री. वाय. बी. कुंभार, श्री. एस. वाय. टिपुगडे, श्री. आर. एम. काळे, श्री. ए. व्ही. दळवी, श्री. के. डी. भोसले, श्री. ए. एस. जाधव कार्यरत आहेत.

**माजी विद्यार्थ्यांची समृद्ध परंपरा :**

पन्नास वर्षांच्या काळात हजारो विद्यार्थ्यांनी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेअंतर्गत ज्ञानार्जन केले. आपल्या ज्ञानाच्या माध्यमातून समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये आजही शहाजीचे विद्यार्थी-विद्यार्थीनी विविधांगी सेवा करीत आहेत. या सर्व माजी विद्यार्थ्यांचा आम्हाला अभिमान असून त्यातील काहींचा उल्लेख पुढीलप्रमाणे.

1) श्री. ज्ञानेश्वर मुळे, निवृत्त आय.ए.एस. अधिकारी, भारत सरकार.
2) श्री. भूषण गगराणी, सनदी अधिकारी, महाराष्ट्र शासन.
3) सुजाता पाटील, डी.वाय.एस.पी.
4) श्री. सुहास नाडगौडा, Additional S. P. Pune.
5) श्री. यशवंत व्हटकर, पोलीस उपआयुक्त, मुंबई.
6) निलम पाटील, पी.एस.आय.
7) श्री. अमित पाटील, ए.पी.आय.
8) श्री. अंकुश चिंतामण, ए.पी.आय.
9) श्री. लक्ष्मण चिंतामण, पी.आय.
10) श्री. नितीन बाबर, पी.एस.आय.

**ग्रंथालयाचे नामांतर (शिवाजी ग्रंथालय) :**

सन 1996 मध्ये प्राचार्य डॉ. व्ही. डी. कटांबळे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृतीचा समारंभ बॅरिस्टर डॉ. पी. जी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. या सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. कटांबळे यांनी कै. बोंद्रे दादांच्याकडे ग्रंथालयास 'शिवाजी ग्रंथालय' असे नाव देण्याची विनंती केली. तेव्हा कै. बोंद्रेदादा आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ती विनंती तत्काळ मान्य केली आणि ग्रंथालयास 'शिवाजी ग्रंथालय' असे नाव देण्यात आले. महाविद्यालयाच्या वाढत्या विद्यार्थी संख्येबरोबर ग्रंथालय

आणि पुस्तकांची संख्या वरचेवर वाढत होती मात्र ग्रंथालय अपुरे पडत होते. यासाठी सन 2001 मध्ये ग्रंथालय विस्तारीकरण करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. यूजीसीच्या वित्तीय सहाय्यतून शिवाजी ग्रंथालयाचे विस्तारीकरण पूर्ण झाले.

**नॅक मूल्यांकन :**

राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषद (नॅक) बंगळूर, यांचे मार्फत महाविद्यालयांचे मूल्यांकन करण्यात येते. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे नॅककडून दोन वेळा मूल्यांकन झाले. पहिले मूल्यांकन तीन सदस्यीय समितीने दि. 27 व 28 फेब्रुवारी 2004 रोजी केले. पहिल्या नॅक मूल्यांकनामध्ये महाविद्यालयास अधिस्विकृती मिळाली आणि B++ हा दर्जा मिळाला. महाविद्यालयाचे दुसरे पुर्नमूल्यांकन सन 2014 मध्ये झाले. नॅक समितीने दि. 8, 9 आणि 10 डिसेंबर 2014 या कलावधीत भेट देवून महाविद्यालयाचे दुसरे पुनर्मूल्यांकन केले. यामध्ये महाविद्यालयास B दर्जा प्राप्त झाला. (CGPA 2.61)

**व्यवसायाभिमुख कोर्सेसची सुरवात :**

दि. 15 जून 1985 रोजी महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागाचा पदव्युत्तर (एम.कॉम.) अभ्यासक्रम सुरू झाला. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू प्रा. के. भोगीशयन यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. नामदेवराव कांबळे होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कटांबळे यांनी शिवाजी विद्यापीठाने नव्याने सुरू केलेल्या ललित कला विभागासाठी प्राध्यापक व कर्मचारी यांनी जमा केलेला 2001 रुपयाचा निधी कुलगुरूंच्याकडे सुपूर्द केला. जून 1998 मध्ये बी.कॉम. इंग्रजी माध्यमाचे वर्ग विनाअनुदान तत्वावर सुरू केले, मात्र शासन स्तरावरून अनुदान प्राप्त न झाल्याने पुढे काही वर्षानी ते बंद केले. सन 2009 मध्ये युजीसीच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये Travel and Tourism हा कोर्स सुरू करण्यात आला. सन 2008-09 या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयामध्ये बीसीए विभाग सुरू झाला. सन 2011 पासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये एमबीए अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून सन 2014-15 पासून विनाअनुदानीत तत्वावर विज्ञान विभाग सुरू करण्यात आला आहे.

**महाविद्यालयास मान्यवरांच्या भेटी :**

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक नामवंतांनी विविध कार्यक्रम प्रसंगी भेटी दिल्या. मा. यशवंतराव चव्हाण, मा. बाळासाहेब देसाई, मा. वसंतदादा पाटील, मा. वसंतराव नाईक, मा. बाळासाहेब भारदे, मा. शरद पवार, मा. शालिनीताई पाटील, मा. यशवंतराव मोहिते, मा. मोहन धारिया, मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्यिक मा. शिवाजी सावंत, मा. रणजित देसाई, मा. रा. रं. बोराडे, मा. ना. गो. गोरे, मा. सुंदरलाल बहुगुणा, मा. मधु मंगेश कर्णिक, मा. गो. नी. दांडेकर, मा. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. के. भोगिशयन, मा. राम गबाळे, प्रा. आर. के. कणबरकर, बॅ. पी. जी. पाटील, मा. शिवाजीराव भोसले, मा. पंडित भीमसेन जोशी, मा. शंकर पाटील, प्रा. फ. मु. शिंदे, प्रा. अरुण निगवेकर, मा. निशिगंधा वाड, प्रा. शरणकुमार लिंबाळे, प्रा. दत्ता भगत, प्रा. बाबुराव बागूल, मा. ग. बा. बेहेरे, डॉ. भा. श. भणगे, मा. प्रा. तु. का. संत, प्रा. अनंत काणेकर, मा. नारायण सुर्वे, मा. भालजी पेंढारकर, मा. चित्तरंजन कोल्हटकर, मा. अरुण साधू, मा. कुमार सप्तर्षि, डॉ. शिवराम भोजे, मा. मोहन जोशी, डॉ. नायर वासुदेवन, मा. तारा भावळकर, मा. सुरेश भट, डॉ. अ. रा. कुलकर्णी, मा. राम मेघे, डॉ. नीरज हात्तेकर, डॉ. बी. एल. पाटील, प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. भास्कर धाटवकर, डॉ. जी. टी. कुलकर्णी, प्रा. डॉ. सुरेन्द्र राव

(मंगलोर विद्यापीठ), प्रा. डॉ. अशोक भोईटे, प्रा. डॉ. एन. जे. पवार, डॉ. स्टुअर्ट गोर्डन (अमेरिका), प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह इतर अनेक मान्यवरानी महाविद्यालयास भेटी दिल्या आहेत.

**श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय स्थापनेपासून राबविलेले उपक्रम :**

**1) कर्मवीर विठ्ठल रामजी शिदे संशोधन केंद्र (महाराष्ट्रातील पहिले केंद्र) :**

सामाजिक समतेचा आणि समानतेचा संदेश देणाऱ्या ज्या महान विभूतींनी महाराष्ट्राच्या अन् देशाच्या सामाजिक सुधारणा चळवळीत मोलाचे योगदान दिले, त्या महान विभूतींच्या विचारांचा अखंड जागर व्हावा, त्यांचे विचार विद्यार्थी आणि समाजापर्यंत पोहचावेत यासाठी संस्था आणि महाविद्यालयाने अनेक उपक्रम सुरू केले. यामध्ये 1 डिसेंबर 1974 रोजी सुरू झालेल्या कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संशोधन केंद्राचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. संशोधन केंद्राचा उद्घाटन समारंभ देशाचे थोर नेते श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतरावजी नाईक यांच्या उपस्थितीत महात्मा फुले (शलिनी पॅलेस) सदनात झाला. या प्रसंगी खा. कै. शंकरराव मोरे यांचे लेखन व पत्रव्यवहार त्यांचे चिरंजीव आ. रवींद्र मोरे आणि त्यांच्या बंधूंनी केंद्रास दिले.

**2) मुलींच्या शैक्षणिक शुल्क माफीचा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग:**

सन 1974-75 या राजर्षि शाहू छत्रपती महाराजांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून महाविद्यालयातील सर्व मुलींना शैक्षणिक शुल्क माफीचा निर्णय घेतला. मुलींच्या शैक्षणिक शुल्क माफीचा उपक्रम रबिवणारे श्री शहाजी महाविद्यालय महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय होते.

**3) कै. श्रीपतराव बोंद्रे दादा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :**

महाविद्यालयाची स्थापना होत असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी यासाठी महाविद्यालयाने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत असे उदिष्ट ठेवले होते. याच दृष्टीकोणातून सन 1976 मध्ये स्पर्धा परीक्षा आणि व्यवसाय मार्गदर्शन केंद्र महाविद्यालयामार्फत सुरू करण्यात आले. सन 2014 मध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राचे कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र असे नामकरण करण्यात आले.

**4) विविधगुण दर्शन विभाग :**

विद्यार्थ्यांच्यामध्ये सांस्कृतिक अभिरुचि निर्माण होणेसाठी महाविद्यालयाने अनेकविध नवनवीन उपक्रम सुरू केले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वावा मिळवा यासाठी 1974 पासून Annual Social हा उपक्रम सुरू करण्यात आला. यामध्ये काव्यवाचन, कथा कथन, नाट्य वाचन, अभिनय दिग्दर्शन, निवेदन, गायन, वादन, नृत्य, हस्तकला, नाट्यकला, नकला, चित्रकला, फोटोग्राफी इत्यादीच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. नुसते व्यासपीठच उपलब्ध करून दिले नाही तर त्या त्या क्षेत्रातील अनेक नामवंत कलाकार, गायक, वादक, आणि विचारवंतांची व्याख्याने व प्रात्यक्षिके आयोजित केली.

**5) सॉक्रेटिक क्लब आणि शाहू क्लब (मुक्त व्यासपीठ) :**

प्राचार्य डॉ. शिंदे यांनी महाविद्यालयामध्ये अतिशय महत्वाचे दोन उपक्रम सुरू केले. यामध्ये, 'शाहू क्लब' आणि 'सॉक्रेटिक क्लब' या दोन महत्वाच्या व्यासपीठांचा समावेश होतो. दि. 20 सप्टेंबर 1974 रोजी डॉ. शिंदे यांनी महाविद्यालयात शाहू क्लब आणि सॉक्रेटिक क्लब सुरू करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्याबरोबर प्राध्यापकांच्यामध्ये आत्मविश्वास वाढावा आणि त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध व्हावे या हेतूने सुरू झालेला उपक्रम आजही उत्साहाने राबविण्यात येतो.

**6) कमवा व शिका योजना :**

'कमवा व शिका' ही योजना गरीब व होतकरू विद्यार्थांच्यासाठी सुरू केली. संस्थेने आर्थिक झळ सोसून ही योजना कार्यान्वित केली आणि पुढे अनेक वर्षे यशस्वीपणे राबविली. या योजनेअंतर्गत शिक्षणापासून वंचित असलेल्या गरजू व गरीब 25 विद्यार्थ्यांची वसतिगृहात राहोण्या-जेवण्याची सोय संस्थेने केली आहे. या विद्यार्थ्यांच्याकडून बांधकाम, बागकाम, भोजनगृहातील व्यवस्था इत्यादी कामे ठरवून दिलेल्या वेळेत करून घेण्यात येत.

**7) स्त्री व्यक्तिमत्व विकास समिती :**

महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी सन 1982-83 मध्ये महिला विभाग सुरू करण्यात आला. प्रारंभापासून डॉ. मीना कुलकर्णी त्याचे कामकाज पाहत होत्या. विद्यार्थिनींना आपलेव्यक्तिमत्व विकसित करता यावे, आपले आरोग्य नीट नेटके ठेवता यावे, महिलांचे इतर अनेक प्रश्न सोडविण्यासाठी मदत व्हावी यासाठी या विभागातर्फे विद्यार्थिनींसाठी विविध कार्यक्रम केले जात. सन 1998-99 मध्ये महिला विभागाचे नामांतर स्त्री व्यक्तिमत्व विकास समिती असे करण्यात आले. प्रतिवर्षी या विभागाच्या माध्यमातून महविद्यालयातील विद्यार्थिनींची मोफत आरोग्य तपासणी होत असून मुलींनी स्वावलंबी आणि आत्मनिर्भर व्हावे यासाठी विविध कोर्स सुरू आहेत.

**8) श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या कर्मचाऱ्याची पतसंस्था :**

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या आर्थिक समस्या ध्यानात घेवून प्राचार्य डॉ. व्ही. डी. कटांबळे यांच्या कारकिर्दीत प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या पुढाकाराने श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या कर्मचाऱ्यांची पतसंस्था सुरू केली. 25 ऑगस्ट 1983 रोजी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते या पतसंस्थेचे उद्घाटन झाले आहे.

**9) व्यसनमुक्त महाविद्यालय उपक्रम (Addiction Free Campus) :**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या परिसरात सन 1998 पासून 'व्यसनमुक्त महाविद्यालय परिसर' हा उपक्रम राबविण्यास सुरूवात झाली. अशा प्रकारची संकल्पना राबविणारे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिलेच महाविद्यालय आहे. या उपक्रमाचे शासनस्तरावरून कौतुक करण्यात आले.

**10) 'शहाजीयन' माजी विद्यार्थी संघ :**

महाविद्यालयाने आजी-माजी विद्यार्थ्यांच्यामध्ये एक बंध निर्माण व्हावा, महविद्यालयातून शिक्षण घेवून बाहेर पडलेले विद्यार्थी महाविद्यालयाच्या कायमस्वरूपी संलग्न रहावेत, जोडले जावेत आणि महविद्यालयाशी त्यांची नाळ कायमची जोडली जावी या उद्देशाने सन 1998 मध्ये शहाजीयन माजी विद्यार्थी संघ सुरू करण्यात आला. या मंडळाची दि 8 जुलै 2008 रोजी रीतसर नोंदणी (MAHA/24922/KO) करण्यात आली असून संघाच्या स्थापनेपासून श्री बाबासो पाटील-आसुर्लेकर मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

**11) दूर शिक्षण केंद्र:**

जे विद्यार्थी महाविद्यालयात नियमित प्रवेश घेवून आपले शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत त्यांच्यासाठी शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण केंद्राची सोय केलेली असून सन 2007 पासून महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राची सुरवात केली.

## 12) अग्रणी महाविद्यालय :

शिवाजी विद्यापीठाने सन 2006 पासून अग्रणी महाविद्यालय योजना राबविण्यास सुरूवात केली. महाविद्यालयाने या योजने अंतर्गत आजतागायत 30 इतक्या अभिनव स्वरुपाच्या कार्यशाळांचे यशस्वी आयोजन केले आहे. सन 2015-16 ते 2018-19 या काळात महविद्यालयाची शिवाजी विद्यापीठाने अग्रणी महाविद्यालय (लीड कॉलेज) म्हणून निवड केली. याकाळात महविद्यालयाने 20 कार्यशाळांचे विविध महाविद्यालयांच्या माध्यमातून उत्तम आयोजन केले आहे.

**महाविद्यालयच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने काही ठळक नोंदी पुढील प्रमाणे आहेत.**

1) महाविद्यालयातील प्राध्यापकांशी संबधीत अडीअडचणी सोडवणूक करण्यासाठी सन 1974 स्टाफ वेलफेअर समिती सुरू करण्यात आली.
2) सन 1975-76 पासून विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेच्या अगोदर 'Mini Question Bank' देण्याचा उपक्रम सुरू केला.याच्या परिणाम स्वरूप विद्यार्थ्यांचा विद्यापीठ स्तरावरील निकाल वाढण्यास झाली.
3) महाविद्यालयातील विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे योग्य पद्धतीने नियोजन आयोजन करण्यासाठी सन 1980 मध्ये प्रथम जिमखाना समिती नेमण्यात आली. प्रा. आनंद वैराट हे या समितीचे पहिले प्रमुख होते.
4) सन 1981-82 मध्ये 'शहाजी हायकर्स' विभाग सुरू करण्यात आला. या विभागाच्या माध्यमातून प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्यासाठी सायकल सफारीचे प्रतीवर्षी आयोजन केले जात असे.
5) महाविद्याल्यामध्ये वाणिज्य विभागाच्या माध्यमातून दि. 20 सप्टेबर 1982 रोजी 'कॉमर्स फोरम'ची सुरवात करण्यात आली.
6) अर्थशास्त्र विषयाच्या विभागासाठी दि. 5 जानेवारी 1984 रोजी नवीन नियोजन मंडळाची सुरवात करण्यात आली.
7) सन 1984 मध्ये इंग्रजी विभागाने 'मेघदूत', हिन्दी विभागाने 'आराधना' ही भित्तिपत्रके सुरू केली.
8) सन 1984-85 मध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्यासाठी 'गिरीभ्रमंती' हा नवीन उपक्रम सुरू केला. याचे उदघाटन ज्येष्ठ इतिहास गो. नी. दांडेकर यांच्या हस्ते झाले होते.
9) 1998 मध्ये इंग्रजी विभागाने English Language and Literary Association (ELLA)च्या माध्यमातून 'Raincow' नावाचे भित्तिपत्रक सुरू केले.
10) सन 1998 मध्ये शिक्षक-पालक योजना सुरू केली.
11) सन 1998 मध्ये संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयातील कार्यालयीन कर्मचाऱ्यासाठी आधुनिक पद्धतीचे ज्ञान प्राप्त व्हावे आणि संगणक आधुनिकीकरण करण्यासाठी "Training Programme for Office Workers" घेण्यात आला.
12) सन 2012-13 पासून 2014-15 पर्यंत महविद्यालयात रेड रीबन क्लब ही संकल्पना अतिशय प्रभावीपणे रबिविण्यात आली.
13) शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून पहिली छात्र सभा आयोजित करण्याचा बहुमान मिळाला आहे. (2014)
14) विद्यार्थ्यांच्या मध्ये संशोधन चालना वाढावी यासाठी कुलपती महोदयांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या आविष्कार स्पर्धा (सन 2015) महाविद्यालयाने यशस्वीरित्या संपन्न केल्या.

## * नवोपक्रम *

1 फेब्रुवारी 2018 रोजी महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य म्हणून डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी सुत्रे सांभाळली. प्राचार्य पदाचा कार्यभार सांभाळण्याअगोदर प्राचार्य डॉ. शानेदिवाण हे महाविद्यालयाच्या अंतर्गत हमी कक्ष (आय.क्यु.ए.सी.)चे समन्वयक होते. त्या काळापासून महाविद्यालयीन स्तरावर अनेक वेगवेगळे उपक्रम, नवोपक्रम सुरू झाले आहेत. त्यांचा विभागस्तरावर आढावा पुढीलप्रमाणे मांडता येईल.

1) महाविद्यालयीन स्तरावर अध्यापन व अध्यापनपूरक उपक्रमांमध्ये सुसूत्रता निर्माण होण्याच्या दृष्टीने स्वयंस्पष्ट, परिपूर्ण 'Academic Calender' ही संकल्पना राबविण्यात येत आहे.
2) महाविद्यालयाच्या प्रशासनाने महाविद्यालयाचे 'शहाजी वार्ता' त्रैमासिक सुरू झाले. या मासिकामध्ये तीन महिन्याच्या कालावधीत महाविद्यालयात संपन्न झालेल्या विविध कार्यक्रमांचा तपशील, छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात येतात. सदरचे अंक विद्यार्थी व पालकांना वितरित करण्यात येतात.
3) श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या सूचनेनुसार महाविद्यालयातील कनिष्ठ, वरिष्ठ व प्रशासकीय सहकार्यांसाठी 'ड्रेसकोड' ही संकल्पना राबविण्यात येऊन त्याची अंमलबजावणी सुरू आहे.
4) महाविद्यालयातील वरिष्ठ विभागाकडील सर्व प्राध्यापकांसाठी 'Academic Diary' सुरू असून शैक्षणिक, प्रशासकीय स्तरावर सर्व दैनंदिन नोंदी संकलित होण्यास मदत होत आहे.
5) महाविद्यालयातील माजी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी आणि आजी प्राध्यापक व हितचिंतकांना आवाहन करून सर्व विषयांसाठी 88 पारितोषिके सुरू करण्यात यश आले.
6) शिवाजी विद्यापीठ आजीवन, अध्ययन आणि निरंतर अभ्यास केंद्राच्या सहकार्याने महाविद्यालयामध्ये 15 प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू आहेत.
7) महाविद्यालयामध्ये 'श्रीपतराव बोंद्रेदादा स्मृती व्याख्यानमाला' सुरू करण्यात आली असून डॉ. अरूण भोसले, श्रीमती डॉ. मंजूश्री पवार, डॉ. चंद्रकुमार नलगे, श्री. वसंत भोसले, डॉ. बी. एम. हिर्डेकर यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.
8) शाहू क्लब च्या माध्यमातून प्राचार्य डॉ. विलास पोवार, श्रीमती सीमा पाटील यांची प्रबोधनपर व्याख्याने झाली.
9) महाविद्यालयामध्ये 'आओ भाषा सीखें', 'शब्द ज्ञान वृद्धि' व 'इंग्लिश गॅलरी' या संकल्पना सुरू करण्यात आल्या. या अंतर्गत दररोज एक शब्द मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये लिहून त्याचे विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण होते. या संकल्पनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाचवेळी तीन भाषेतील शब्दसंग्रह वाढण्यास मदत झाली आहे.
10) महाविद्यालयातील विज्ञान विभागाच्या वतीने प्रत्येक विषयातंर्गत 'कॉर्नर' व 'वॉल' ही संकल्पना सुरू झाली आहे. या अंतर्गत आठवड्याच्या सुरूवातीला विषयातंर्गत घटकाच्या अनुषंगाने प्रात्यक्षिकासह माहिती सादर होते.
11) महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी वेळोवेळी संशोधनाचे काम केले आहे. सदरचे काम त्या त्या स्तरावर होत राहते. त्याची माहिती इतरांना होत नाही. ही बाब लक्षात घेऊन महाविद्यालयाने प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या संशोधनाच्या कामाला सर्वांसाठी खुले करण्याच्या उद्देशाने 'रिसर्च कॉर्नर' ही संकल्पना सुरू केली आहे. यामध्ये, प्राध्यापकांचे समकालीन संदर्भाने युक्त असणारे संशोधन लेख प्रदर्शित करण्यात येतात.

12) वेगवेगळ्या विभागातंर्गत 21 सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

13) सर्व विषयातंर्गत विभागीय ग्रंथालयाची कल्पना प्रत्यक्षात राबविण्यात येत आहे.

14) कॉमर्स विभागाने विद्यार्थ्यांमध्ये व्यापारविषयक जाणीवा निर्माण करण्याच्या हेतूने खुला व्यापार मेळावा आयोजित करण्याची प्रक्रिया सुरू असून सलग दोन वर्षे व्यापार मेळाव्याचे आयोजन केले आहे. पहिल्या वर्षी 23 व दुसऱ्या वर्षी 30 हून अधिक वेगवेगळ्या स्टॉल्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी खरेदी-विक्रीचा अनुभव घेतला.

15) महाविद्यालयातील मूल्यांकनाच्या प्रक्रियेमध्ये सातत्याने नवनवीन प्रयोग करण्यात येतात. या वर्षी पारंपरिक मूल्यांकन प्रक्रियेबरोबरच 'सरप्रायझिंग टेस्ट', 'ओपन बुक एक्झाम', 'वस्तुनिष्ठ परीक्षा' अशा वेगवेगळ्या स्तरावरील परीक्षांचे आयोजन करण्यात येत आहे.

16) कोरोना कालावधीत सर्व विषयांचे ऑनलाईन टिचिंग सुरू राहिले. WhatsApp, Google Meet, Zoom, You-Tube, Online Live व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

17) विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रभक्तीची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने 'राष्ट्रीय प्रतीकांची ओळख' हा नाविण्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला. या अंतर्गत राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, घटना, घटनेची प्रास्ताविका अशा बाबींची माहिती दरवर्षी विद्यार्थ्यांना देण्यात येते.

18) विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह अभ्यासविषय समजून देण्याच्या उद्देशाने कोल्हापूर शहरातील ऐतिहासिक स्थळे व स्मारकांची प्रत्यक्ष भेटीद्वारे माहिती करून देण्यात येते.

19) गणपती, दसरा, होळी, रक्षाबंधन, दिपावली अशा पारंपरिक सणांच्या वेळी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीवा निर्माण करण्याच्या हेतूने प्रत्यक्ष कृतीद्वारे संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

19) मराठी भाषा दिन पंधरवडा, लोकशाही पंधरवडा अशा महत्त्वपूर्ण उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करून घेताना व्याख्याने, चर्चासत्रे, भित्तिपत्रके यांचे आयोजन करण्यात येते.

20) वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांनी विज्ञान दिन साजरा करण्यात येतो.

**गेल्या तीन वर्षाच्या काळात महाविद्यालयीन स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबरोबर विविधांगी सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्याचा सर्वसाधारण तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

1) शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये 175, शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये 221, शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये 195 इतक्या कार्यक्रमांचे आयोजन झाले असून त्याचे अद्यावत रेकॉर्ड ठेवण्यात आले आहे.

2) **महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांच्या काळात प्रथमच राज्यशास्त्र व भूगोल विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात आले.**

3) कोरोना कालावधीत 12 विविध विद्याशखांच्या वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

4) महाविद्यालयाच्या भौतिक प्रगतीमध्ये अनेक बाबींचा समावेश असून प्राचार्य कक्षामध्ये राजर्षी शाहू छत्रपती महाराज व स्टाफरूममध्ये राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांच्यासह कै. श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या प्रतिमा लावण्यात आल्या.

5) छ. राजाराम महाराज व श्री शहाजी छत्रपती महाराज यांच्या जीवन कार्यासंबंधाने माहिती पुतळ्या शेजारी लावण्यात आली.

6) प्रशासकीय कामकाज संगणकीकृत करून विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवा अधिक गतीमानतेने देण्याचा प्रयत्न सुरू आहे.
7) कनिष्ठ, वरिष्ठ, प्रशासकीय सहकारी, महाविद्यालय विकास समिती तसेच अन्य नावांचे फलक दर्शनी भागात लावण्यात आले.
8) ग्रंथालय संगणकीकरणाची प्रक्रिया गतिमान करून नवीन 'Coha' सॉफ्टवेअर अंतर्भूत करण्यात आले आहे.
9) परीक्षा कक्ष अद्ययावत करण्यात आला.
10) विज्ञान विभागाकडील सर्व विषयांच्या प्रयोगशाळांमध्ये शास्त्रज्ञांचे फोटो लावण्यात आले.
11) महाविद्यालयाचे ग्रीन ऑडीट, वॉटर ऑडीट, जेण्डर ऑडीट, फायर ऑडीट करण्यात आले.

महाविद्यालयाच्या पन्नास वर्षाच्या काळामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय व भौतिक सुविधा निर्माण करण्याबरोबरच विद्यार्थी विकासाचा विचार सातत्याने केंद्रस्थानी राहिला आहे. आजही हाच विचार घेऊन महाविद्यालयाचे सर्व घटक कार्यरत आहेत.

**प्राध्यापक गौरव व पुरस्कार :**

सुवर्ण महोत्सवी वर्षातील वाटचाल नजरेसमोर येत असताना प्राध्यापकांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामगिरीचा झालेला गौरवही अभिमान वाटावा असा आहे. यातील काही ठळक पुरस्कारांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

1) प्राचार्य डॉ. व्ही. डी. कटांबळे यांना सन 1996 साली महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला.
2) प्राचार्य डॉ. व्ही. डी. कटांबळे यांच्या रामायणावरील दीर्घ लेखासाठी कुंती गोयल ट्रस्ट, अमेरिका यांच्याकडून जागतिक स्तरावरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला.
3) प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांना सन 2008-09 मध्ये महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार आणि सन 2010 साली गुणवंत शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला.
4) प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी बी. जे. परीक्षेत महाराष्ट्रात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. यासाठी यांना लोकमान्य टिळक पुरस्कार व इंदुताई ज. टिळक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
5) प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांना साहित्यातील कामगिरीबद्दल तांबटकाका ग्रंथ पुरस्कार, राधानगरी साहित्य मंच पुरस्कार आणि मुस्लीम साहित्य परिषदेच्या वाङमय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
6) ज्येष्ठ प्राध्यापक श्री. चंद्रकुमार नलगे यांना डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले.
7) डॉ. सुरेश शिखरे यांना उत्कृष्ठ प्रबंधासाठीचा शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा सिताबाई कुलकर्णी पुरस्कार प्राप्त झाला. (सन 2017-18)
8) डॉ. एम. एस. वनमोरे यांना रोटरी क्लबतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला.
9) डॉ. डी. के. वळवी यांना दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने विशेष ग्रंथ पुरस्कार आणि फडकी फाऊंडेशनच्या वतीने उत्कृष्ट कादंबरी लेखन पुरस्कार प्राप्त झाला.
10) डॉ. सौ. एस. एस. राठोड यांना लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, मिरज यांच्या वतीने मातोश्री पुरस्कार प्राप्त झाला.

**महाविद्यालयाचा मानसन्मान :**

आपल्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयास सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील उत्तम कार्याबद्दल विविध मानसन्मान प्राप्त झालेले आहेत. यामध्ये,

- सन 1974-75 ते 1977-78 मध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी जे विविध अभिनव उपक्रम राबविले त्याची दाखल घेत विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयास सन 1977-78 मध्ये गुणवत्ता कॉलेज (Quality College)चा दर्जा बहाल केला.
- महाविद्यालयाने व्यसनमुक्त महाविद्यालयाच्या अंतर्गत जे नवोपक्रम रबिवले याबद्दल महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य केल्याबदल शिवाजी विद्यापीठाचा सन 2012-13 व 2013-14 साठी उत्कृष्ट महाविद्यालयचा पुरस्कार प्राप्त झालो.
- महाविद्यालयाची विद्यार्थिनी सीमा गावडे हिला राष्ट्रीय सेवा योजने मध्ये केलेल्या कार्याबद्दल केंद्र सरकारचा इंदिरा गांधी नॅशनल अवॉर्ड प्राप्त झाला.
- महाविद्यालयाने विद्यापीठ, पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ स्पर्धा आणि राष्ट्रीय विद्यापीठ स्पर्धामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल मानाची कै. मेघनाथ नागेशकर ट्रॉफी सलग तीन वर्षे (सन 2014-15, 2015-16, 2016-17) महाविद्यालयाने पटकाविली आहे.
- महाविद्यालयाच्या सहा खेळाडू विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

15 जून 1971 रोजी स्थापन झालेल्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने 50 वर्षाच्या काळात शैक्षणिक व प्रशासकीय स्तरावर दमदार कामगिरी केली आहे. सुरूवातीच्या काळात अगदीच कमी विद्यार्थी संख्येवर सुरू झालेल्या या महाविद्यालयाची आजची विद्यार्थी संख्या 4000 हून अधिक असून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवून कै. श्रीपतराव बोंद्रेदादा यांचा कृतीयुक्त वारसा जपण्याचा प्रयत्न संस्था व महाविद्यालयाचा प्रत्येक घटक करीत आहे. यामध्ये संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, प्रबंधक श्री. रवींद्र भोसले, अधिक्षक श्री. मनिष भोसले, वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक वृंद, प्रशासकीय सहकारी यांचे प्रयत्न व योगदान महत्त्वपूर्ण आहे.